SAMPLE QUESTIONS/QUESTION BANK
FOR CLASS X-II TERM-2012-13
(Marathi Code- 009)

---

# SECTION-A
## (Reading)

प्रश्न.1ः खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

विनोदी माणसाबद्दल भलतेच गैरसमज असतात. ज्ञानी माणूस गंभीर असतो, तो वरवर पाहतो, कारण त्याला काही कळत नाही तो खोलवर जाऊ शकत नाही असे लोक समजतात, पण जमिनीवर सरपटणा–या किडयांपेक्षा वरवर आभाळात उडणा–या चंडोलाला जास्त कळत असते. विद्‍वान हा गंभीर असतो. पण मी गंभीर नाही म्हणून मी विद्‍वान नाही असे काहीजण समजतात. विनोदी माणूस वरवर पाहणारा रंगेल वाटतो. इंग्रजी वाड्.मयात घुबड हे ज्ञानाचे प्रतीक आहे. आपल्याकडे मात्र त्याला अशुभ मानतात. विनोदी माणूस हा फुलपाखरासारखा असतो. तो एका फुलावरून दुस–या फुलावर जातो. कधी रस चाखतो, कधी चाखीत नाही. विनोदी माणूस वरकरणी जीवनाचा विचार करीत नाही असे दिसले, तरी असे समजणे चुकीचे आहे. विनोदाच्या व्याकरणामागेही एक शास्त्र आहे, एक भूमिका आहे, एक सिद्‍धांत आहे. विनोदाचे नियम ठरलेले आहेत. ज्याला विनोदाचे नियम कळत नाहीत त्याला विनोद कळत नाही. हसणे म्हणजे विनोद नव्हे. विनोदाचा आस्वाद घेता आला पाहिजे. विनोद स्वतः वाईट नाही पण त्याचे नातेवाईक फार आहेत. वात्रटपणा, गावंढळपणा, पांचटपणा, ग्राम्यता, अश्लीलता, बीभत्सपणा असे एकापेक्षा एक इरसाल नातेवाईक आहेत. माणसाला भाषा येण्यापूर्वी हासता येते. हास्य ही मानवाची मूलभूत प्रवृत्ती आहे व त्यावरच विनोदाची इमारत उभारली गेली आहे. जीवनातील विसंगती, विकृती यांच्याकडे दयाबुद्‍धीने जो पाहतो तो विनोदी अशी व्याख्या ॲरिस्टॉटलने केली आहे. म्हणूनच विनोद समजायला मनुष्य एका विशिष्ट परिस्थितीत पाहिजे. वाटेल त्या परिस्थितीत माणूस विनोद ग्रहण करू शकत नाही. त्यासाठी विशिष्ट परिस्थितीशी समरस व्हावे लागते.

1. ‘हास्य ही मानवाची मूलभूत प्रवृत्ती आहे’. या वाक्याचा काळ खालीलपैकी कोणता आहे. — 01
   अ. भूतकाळ ब. वर्तमानकाळ क. भविष्यकाळ
   ड. यापैकी नाही.
2. ज्ञानी आणि विनोदी माणसातील फरक सांगून विनोदी माणसाची वैशिष्टये स्पष्ट करा. — 04
3. परिच्छेदात विनोदाची व्याख्या कोणी केली आहे व ती व्याख्या कोणती आहे ? — 03

प्रश्न.2: खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

'नेट' हया इंग्रजी शब्दाचा मराठी अर्थ आहे जाळे, मच्छिमारांचे जाळे, कोळयाचे जाळे, एखादया संघटनेचे जाळे, शिक्षण संस्थांचे जाळे, टेलिफोनचे जाळे असे शब्द आपल्या चांगलेच परिचयाचे आहेत. मच्छिमारांचे जाळे टणक दो–यांनी विणलेले असतें. कोळी आपल्या शरीरातून तंतूमय धागे काढून सुंदर जाळे बांधतो. संघटनेमधील व्यक्ती काही नियमांनी परस्परांशी बांधलेल्या असतात. इंटरनेट हेही एक जाळेच आहे. पण ते जाळे आहे संगणकांचे ! संगणकांची लहान–मोठी जाळी परस्परांशी सांधून जे एक संगणकाचे जगभर जाळे निर्माण होते त्याचेच नाव इंटरनेट ! 'नेटवर्क ऑफ नेटवर्क्स' असे इंटरनेटचे वर्णन करण्यात येते ते अगदी यथार्थ आहे. 'इन्फर्मेशन सुपरहायवे' किंवा 'सायबरस्पेस' या अभिनव नावांनीही इंटरनेट ओळखले जाते. इन्फर्मेशन सुपरहायवेसाठी मराठीत 'ज्ञानाचा अतिद्रुतगती मार्ग' असा काहीसा शब्द वापरता येईलं.

संगणक परस्परांना जोडण्याचा नेटवर्क हा मार्ग आहे. पण त्यामध्ये एका मध्यवर्ती संगणकाबरोबर नेटवर्कमधील इतर सर्व संगणक जोडलेले असतात. रेल्वे किंवा विमानांचे आरक्षण अशा प्रकारच्या संगणकांच्या नेटवर्कच्या साहायाने केले जाते. इंटरनेटमधील कोणताही संगणक दुस–या कोणत्याही संगणकाशी साक्षात संबंध प्रस्थापित करू शकतो. त्यामुळेच इंटरनेट हे संगणकांचे एक महाप्रचंड जगभर पसरलेले जाळे आहे. या जाळयातील संगणकांची संख्या कोट्यावधींमध्ये मोजावी लागेल. या अफाट जाळयात मुक्त हस्ताने ज्ञानाचे आदानप्रदान करता येते.

1. 'आरक्षण' या शब्दाचे लिंग कोणते आहे ? 01
   अ. पुल्लिंग ब. नपुसकलिंग क. स्त्रीलिंग ड. यापैकी नाही
2. 'जाळे' हा शब्द लेखकांनी विविध उदाहरणांनी कसा पटवून दिलेला आहे ? 03
3. इंटरनेट कसे काम करते आणि त्याचा उपयोग काय ? 03

प्रश्न.1: खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

आज आरोग्याबद्दल समाजात जागरूकतां वाढलेंली दिसून येते. लोक आजारी पडल्यावर कोणत्या पॅथीची उपाययोजना करायची हा हल्ली विचार करू लागले आहेत. आधुनिक वैद्यकशास्त्र अत्यंत प्रगत झालेले आहे. अद्ययावत तंत्रज्ञान, नवनवीन चाचण्या यामुळे बरेच असाध्य आजार हल्ली आटोक्यात आलेले आहेत हे जरी खरे असले तरी हे उपचार सर्वसामान्यांना परवडू शकत नाही. कधी कधी तर उपचारांपेक्षा रोग परवडतो, असे होऊन जाते. शिवाय एकदा डॉक्टरकडे गेले की रोगी तपासण्यांच्या चक्रात येवढा काही गुरफटतो की, त्यातून बाहेर निघणे कठीण होऊन बसते.

अशा परिस्थितीत आजारीच पडू नये अशी काही उपाययोजना आहे का, याचा शोध घेण्याची गरज भासू लागते. पूर्वीच्या काळी वैद्यकीय उपचारांची उपलब्धता नसूनही लोक निरोगी होते याचे रहस्य काय असू शकते ? आजचे युग अतिशय धावपळीचे व वेगवान असल्यामुळे तब्येतीच्या तक्रारी वाढत आहेत असे जरी समर्थन केले तरी सगळाच दोष आजच्या परिस्थितीवर लादता येत नाही. पन्नास टक्के दोष माणसांचाही आहे. हे दोष कोणते ? त्यात सुधारणा होऊ शकते का ? तर होय. आयुर्वेद शास्त्रात आपल्याला अनेक उत्तरे सापडू शकतात.

आयुष्याचा वेद म्हणजे आयुर्वेद. ऋग्वेद, अथर्ववेद, यजुर्वेद, सामवेद ज्या भारतीय संस्कृतीत प्रमाण मानले जातात त्याच भारतभूमीवर आयुर्वेदाची निर्मिती झाली आहे. चरक, सुश्रुत, वाग्भटादि ऋषींनी आयुर्वेदाची संहिता लिहिलेली आहे. ऋषींची दार्शनिकता, विज्ञाननिष्ठता, यथार्थ ज्ञान यांचा भारतीयांना परिचय आहेच. वेदांचा काळ हा इ.स. पूर्व 23,720 वर्ष समजला जातो. वेदकालानंतर काही कालावधीने आयुर्वेदाची निर्मिती झाली. त्या प्राचीन काळचे वाड्.मय आजही तितकेच यथार्थ आहे हे बघून ऋषींच्या द्रष्टेपणाची कमाल वाटते.

1. पूर्वीच्या काळी वैद्यकीय उपचारांची उपलब्धता नसूनही लोक निरोगी होते. या वाक्याचा काळ -------- आहे. 01
अ. भविष्यकाळ ब. अपूर्णभूतकाळ क. भूतकाळ ड. वर्तमानकाळ

2. 'कधी कधी उपचारांपेक्षा रोग परवडतो' असे लेखक का म्हणतात ? 03

3. पूर्वीच्या काळचे लोक निरोगी का होते ? आजच्या लोकांच्या आरोग्याबाबत तक्रारी का वाढल्या आहेत ? 04

प्रश्न.2: खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

माझा इंग्रजीला विरोध नाही. माझ्या मराठी भाषेवरचं प्रेम म्हणजे इतर भाषांशी वैर असा अर्थ नाही. उलट आपआपल्या मातृभाषेवर प्रेम करायचा प्रत्येकाला हक्क आहे. प्रत्येक भाषा आपापली सुंदर वैशिष्टये घेऊन आलेली असते. इंग्रजी तर शेक्सपियरची भाषा; मिल्टन, वर्डस्वर्थ, कीट्स, शेली यांची भाषा, डिकन्स, वुडहाऊस यांची भाषा, बर्नार्ड शॉची भाषा, न्युटनची भाषा – अशी भाषा आपल्याला यावी हया हेतूने कोणी इंग्रजी शिकत असेल तर त्या माणसाचं कौतुकचं करायला हवं किंवा इंग्रजी ही जगभर पसरलेली भाषा आहे, तिच्यावर प्रभुत्व मिळवावं, म्हणजे ज्ञान विज्ञानाचे अनेक ग्रंथ वाचायला मिळतील, जगातल्या शास्त्रज्ञांशी, कलावंताशी , लेखकांशी संवाद साधता येतील, अशा हेतुने कुणी इंग्रजीच कशाला, प्रगत देशांतल्या जर्मन, रशियन, फ्रेंच, इटालियन हयांसारख्या भाषा आत्मसात करण्याचा प्रयत्न करील तर अशा विद्यार्थ्याला उत्तेजन दिलं पाहिजे पण त्यासाठी मराठीला झिडकारायची किंवा तिच्याकडे तुच्छतेने पाहायची जरूरी नाही.

1. ग्रंथ या शब्दाचे अनेकवचन खालीलपैकी कोणते ? 01
   अ. ग्रंथे ब. ग्रंथ क. ग्रंथा ड. ग्रंथी
2. मातृभाषेवर प्रेम करावे म्हणजे काय ? 03

3. कोणकोणत्या उद्देशाने इंग्रजी शिकणा–यांचे कौतुक करावे असे लेखक म्हणतात ? 03

प्रश्न.1: खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

कुठल्याही कामाची नशा, त्यातला खरा आनंद ते काम करतानाच जास्त असतो. प्रत्यक्ष कामाच्या पूर्तीचा आनंद तुलनेने फिका भासतो. कुठल्याही कामाच्या यशपूर्तीसाठी चार महत्त्वाच्या गोष्टी डोळयांपुढे असाव्यात. ध्येये निश्चित करणे, सदैव आशावादी विचारांचा पाठपुरावा करणे, पुढे काय होईल हे कल्पनेने पाहत राहणे आणि 'मी ते ध्येय मिळवीनच' असा विश्वास असणे.

त्यातले ध्येयनिश्चितीचे काम अगदी तपशीलवार तयार होते. आशावादी विचारांनी भारलेली तरूण संशोधकांची टीमही होती. झालेले काम वरिष्ठांसमोर सादर करतातना टीमधील सर्वात तरूण व्यक्तीने ते सादर करावे, असा मी आग्रह धरत असे म्हणजे त्यांना कामाची संपूर्ण कल्पना येत असे. तरूण संशोधक बुजुर्गांना अनेक तांत्रिक बाबींवर प्रश्न विचारू लागले,एक प्रकारचे विश्वासाचे वातावरण तयार झाले. एकमेकांबद्दलची भीती नाहीशी झाली. शंका आल्या तर त्यावर मात करायची, चुकले तरी नाउमेद व्हायचे नाही – अशी वृत्ती बनत गेली. असा आत्मविश्वास असलेली व्यक्ती कधी कुणासमोर शरणागती पत्करत नाही. एक शक्ती त्यांच्यामधे असते इथे चुकते आहे, काम फार पडते आहे, मला कुणी सहकार्य देत नाही, माझी कुणाला कदर नाही. माझ्यावर अन्याय होतो– अशी रडगाणी गात बसत नाहीत. सरळ समस्यांना सामोरे भिडून, 'समस्यांपेक्षा, अडथळयांपेक्षा मी मोठा आहे' असा स्वतःशीच युक्तिवाद करत, देवावर विश्वास ठेवून पुढे जात राहतात.

1. 'विश्वास' शब्दाचे लिंग कोणते आहे. 01
   अ. पुल्लिंग ब. स्त्रीलिंग क. नपुसकलिंग ड. यापैकी नाही.

2. कामाच्या यशपूर्तीसाठी कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या असतात ? 03

3. आत्मविश्वास असलेल्या व्यक्तीची कोणती वैशिष्टये लेखकाने सांगितली आहेत ? 04

प्रश्न.2: खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

माणसाचं जीवन म्हणजेच एक परीक्षा आहे. नऊ महिने गर्भवासात राहून जिवंतपणे जन्माला येणं ही एक परीक्षाच ! आईचीही आणि बाळाचीही संयम आणि सहनशीलतेची परिसीमा गाठणारी परीक्षा असते ती आणि मग माणूस हसू लागतो, भोवतालचं जग पाहतो अनुभवतो, अनुकरणातून शिकतो आणि मला हे येतं याचं प्रात्यक्षिक करून दाखवतो. ही देखील एक परीक्षाच. परीक्षेचे क्षण आयुष्यात अनेक येतात. कारणं आणि संधी शोधत बसण्यापेक्षा संधी निर्माण करणं , संकटांनी हतबल न होता विधायक मार्गातं यश प्राप्त करणं यालाच परीक्षा म्हणायचं पण संधी असूनही चारित्र्यसंपन्न राहाणं ही देखील एक परीक्षा. या परीक्षेत सहसा कुणी पास होत नाही. म्हणून ख—या अर्थाने माणसाची हीच खरी परीक्षा. आयुष्याची अखेरची परीक्षा मात्र कठीण आहे आणि ही परीक्षा कुणालाही चुकली नाही.

1. 'मार्ग' हा शब्द खालीलपैकी काय आहे ? 01
   अ. नाम ब. विशेषण क. सर्वनाम ड. कियापद

2. माणसाचं जीवन म्हणजेच एक परीक्षा आहे ? असे लेखक का म्हणतो ? 03

3. परीक्षा कशाला म्हणायचं ? 03

प्रश्न.1: खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

रामायणाचे सारें सार रमणीय कल्पनेतच आहे. रामायणात पितापुत्रांचे प्रेम, मायलेकरांचे प्रेम, भावाभावांतील प्रेम, पतिपत्नीचें प्रेम, हें सारें आहे. परंतु मला रामायण यासाठी नाही प्रिय वाटत. रामाची वानरांशी दोस्ती झाली या गोष्टीमुळे तें मला आवडतें. हल्ली म्हणतात की वानर म्हणजे नागलोक होते. जुनें उकरावयाचें हें इतिहासज्ञांचें कामच आहे. मी त्यांच्या कामाविषयी तकार नाही करीत, परंतु रामाने खरोखरच्या वानरांशी मैत्री जोडली यात काय अशक्य आहे ? राम व वानर दोस्त झाले यातच खरोखर रामाचें रामत्व व रमणीयत्व आहे, तसाच कृष्णाचा गाईंशी संबंध. सर्व कृष्णपूजा यावर उभारलेली आहे. श्रीकृष्णाचे चित्र म्हटलें म्हणजे सभोंवती गाई असावयाच्याच. गोपालकृष्ण ! गोपालकृष्ण ! कृष्णापासून गाय अलग कराल तर कृष्ण काय उरला ? आणि रामापासून वानर दूर केले तर रामात तरी काय राम उरला ? रामाने वानरांच्या ठिकाणचाही परमात्मा पाहिला व त्यांच्याशी प्रेमाचे , जिव्हाळयाचे संबंध जोडले. रामायणाची ही किल्ली. ही किल्ली सोडाल तर गोडी गमवाल. पितापुत्रांचे , मायलेकरांचे सबंधं अन्यत्रही दिसतील. परतु नरावानरांची अन्यत्र न दिसणारी मधुर मैत्री रामायणात आहे. वानराच्या ठिकाणचा

देव रामायणाने पचनीं पाडला. वानरांना पाहून ऋषींना कौतुक वाटे. रामटेकापासून तो कृष्णाकांठापर्यंत जमिनीवर पाय न ठेवता झाडावरच्या झाडांवर उडया मारीत हे वानर हिंडत खेळत. अशीं ती घनदाट जंगले व तेथे खेळणारे ते वानर पाहून प्रेमळ ऋषींस काव्य स्फुरे, कौतुक वाटे. उपनिषदात 'ब्रह्माचे डोळे कसे असतात' हें सांगतांना वानराच्या डोळयांप्रमाणे असतात असें म्हटलें आहे. वानराचे डोळे चंचल. चौफेर त्याची नजर. ब्रह्माचे असेच डोळे हवेत. ईश्वराला डोळे स्थिर ठेवून चालणार नाही. तुम्ही आम्ही ध्यानस्थ बसावें परंतु ईश्वर ध्यानस्थ बसला तर सृष्टीचें कसें होणार ? वानराच्या ठिकाणी सर्वांची काळजी घेणारे ब्रह्माचे डोळे ऋषींना दिसत आहेत. वानराच्या ठिकाणीं देव पहावयास शिका.

1. 'मी ' हा शब्द पुढीलपैकी काय आहे ? 01
अ. विशेषण ब. क्रियापद क. नाम ड. सर्वनाम

2. वानर आणि ब्रह्माच्या डोळयांची तुलना लेखकांनी कशी व का केली आहे ? 04

3. रामायण लेखकांना व इतर वाचकांना कशासाठी प्रिय वाटते ? 03

प्रश्न.2: खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

आजकालच्या शहरी जीवनात गावाबाहेर पडणे व चालणे अशक्य झाले आहे. पण घरच्या घरी सूर्यनमस्कार किंवा योगासने यांचा अवलंब करणे कठीण आहे, पण माणसे घरात बसून टी.व्ही. पाहतात, पत्ते खेळतात, गप्पा मारतात किंवा नुसतेच कशाला तरी रेलून काळ कंठतात. दुर्मिळ नरदेहाची निगा राखावी हा विचार त्यांच्या मनाला येत नाही. नाना प्रकारचे अपथ्य आणि आगळिक करून शरीर खिळखिळे करून घेणे व नंतर डॉक्टरांच्या नजरकैदेत राहणे लोकांना आवडते. आरोग्याअभावी अवघ्या जीवनाचा विरस होतो. या बाबतीत माणसांनी प्राण्यांना गुरूपद द्यावयास हरकत नाही. बैल कधी तंबाखू खात नाही. मांजर कधी चहा पीत नाही. बसल्या बैठकीत पोट भरून घेणे हे अपथ्य पशू करीत नाही, सावकाशीने व अंतराअंतराने रवंथ करीत अगदी नैसर्गिक आहार घेणे ही पशुंची स्वाभाविक दिनचर्या असते. अजीर्ण म्हणजे काय हे त्यांना कळत नाही. अधून–मधून क्षणांची गाढ विश्रांती घेणे किवा अनुभवणे त्यांना शक्य होते. माणसांना भुकेसाठी औषध, पचनासाठी औषध, झोपेसाठी औषध, उठण्यासाठी गजर लागतो. त्यांच्या जीवनाचे यंत्र बिघडून जाते. त्यामागचे तंत्रही बाजूला पडलेले असते. सुखसमाधानाच्या निर्मितीमुळे वाटयाला येणारी कृत्रिम व निर्जीव संपन्नता ही मानसिक दैन्याची निदर्शक असते. माणसांना हे दैन्य हीच श्रीमंती वाटते. या भ्रमाच्या भोव–यातून माणसे बाहेर पडली पाहिजेत.

1. ‘शहरीजीवनात’ या शब्दामध्ये ‘शहरी’ हा शब्द काय आहे. 01

अ. नाम ब. क्रियापद क. सर्वनाम ड. विशेषण

2. शहरी जीवनात कोणकोणत्या गोष्टी करणे अशक्य आहे ? त्यामुळे माणसे कोणती कृत्ये करतात. 03

3. माणसांनी प्राण्यांना गुरूपद का दयावे ? 03

प्रश्न.1: खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

कारणाशिवाय आणि कामाशिवाय वाहनाचा वापर करायचा नाही आणि अकारण रस्त्यावर यायचे नाही, असे जर सर्वांनी ठरविले तर मार्गातले कितीतरी अडथळे कमी होतील. जमेल तेव्हा प्रत्यक्ष चालून पायांचा सन्मान करावा. आठवडयातला एखादा दिवस चालण्यासाठी राखून ठेवला तर ? असे कधी घडेल का, की रस्त्यावर माणसे दिसत आहेत, वाहनांचे नांव नाही की आवाज नाही. आपल्या देशात वारी किंवा तीर्थयात्रा पायी करीत. विनोबाजींनी भूदान यात्रेस सुरवात केली. या पदयात्रेत आनंद होता.जीवनाची गती, व्याप्ती आणि गुंता वाढत चालल्यामुळे वाहननिरपेक्ष जीवन जगता येणार नाही हे खरे, पण म्हणून वाहनविवेक सोडावा का ? आहे गाडी म्हणून कोठेही जावे का ? कामासाठी व कामापुरते वाहन वापरणे हा गरजेचा भाग आहे. पण केवळ चैन पडत नाही म्हणून धावाधाव करणे वेडेपणाचे लक्षण नव्हे काय ? अनेकांच्या जीवनात हे वेड आढळते. गाडी असावी म्हणून, स्कूटर लागते म्हणून, व्हॅन उपयोगी पडते म्हणून, ट्रॅक्स व्यवसायासाठी लागते म्हणून वाहनांची खरेदी करणारे अंगणाचा मोटार स्टॅंड करतात. त्यांना हा ऐहिक बहुमान वाटतो. वाहन हे प्रतिष्ठासूचक चिन्ह मानले जाते. माणसाला घरा बाहेर पडावे लागते. कोठून तरी निघावे लागते, कोठे तरी पोहचावे लागते. निघणे व पोहचणे यातील अंतर विचारात घ्यावे लागते. वेळेचे गणित मांडावे लागते. आपली ऐपत पाहून साधन निवडावे लागते. हा व्यवहार आहे. अपरिहार्य अशी ती जीवितचर्या आहे. परंतु गंमत म्हणून, मैत्रीचा संचार झाला म्हणून विचाराशिवाय क्षणार्धात घर सोडणे हे व्यसन आहे. ही वाहन व्यसनाधीनता मानसिक दुर्बलता वाढविणारी आहे.

1. जमेल तेव्हा प्रत्यक्ष चालून पायांचा सन्मान करावा. या वाक्यातील काळ कोणता ? 01

अ. भूतकाळ ब. वर्तमानकाळ क. भविष्यकाळ ड. यापैकी नाही.

2. लेखकाच्या मते अंगणाचा मोटर स्टॅंड कसा बनतो ? 03

3. लेखकांच्या मते अनेकांच्या मनात वाहनाचे वेड का लागते व त्यावर कोणते उपाय लेखक सुचवितात ? 04

प्रश्न.2: खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

टेलिफोनच्या आजच्या जमान्यात पत्रलेखन हा प्रकार मागे पडत चालला आहे. पोस्टातून पत्रांचा महापूर वाहत असतो, पण ही पत्रे औपचारिक स्वरूपाची असतात. काही विनंतिपत्रे असतात, तर काही माहितीपत्रे असतात. पत्र म्हणजे तरी काय ? तिकिटे लावून पोस्टात टाकलेला लिफाफा म्हणजे पत्र, अशी साधारण समजूत आहे. दूरगावी असणा—या व्यक्तीला धाडलेला लेखी सांगावा म्हणजे पत्र, ही आरंभीची कल्पना ! या पत्रकल्पनेला पुढे चांगलीच पालवी फुटली व तिचा पुरता कायापालट झाला. चांगदेवांनी ज्ञानदेवांना लिहिलेले कोरे पत्र, शिवाजी महाराजांनी औरंगजेबाला लिहिलेले पत्र, ही पूर्वीच्या काळातली प्रसिद्ध पत्रे होत. पंडित नेहरूंनी इंदिरा गांधीना लिहिलेली पत्रे, स्वामी विवेकानंदांनी आपल्या देशी आणि विदेशी शिष्यांना लिहिलेली पत्रे, महात्मा गांधींनी व्हाइसरॉयला लिहिलेली पत्रे , श्री.अरविंदांनी साधकांना लिहिलेली पत्रे ही ग्रंथरूप धारण करून अक्षरवाड्.मयाच्या दालनात जाऊन बसली आहेत.

फोनच्या उपलब्धतेमुळे व वापरामुळे पत्रलेखन मंदावले आहे खरे; पण फोन हा पत्राची बरोबरी करू शकत नाही. फोन खाली ठेवताच तो संपतो ; पत्र मागे उरते. फोन एकाच व्यक्तीपुरता मर्यादित राहतो; पत्र हे या मर्यादेवर मात करते. फोनवरून निरोप देता येतो, बातमी कळवता येते, पण पत्र हे मनोगताचे अक्षरचित्र असते. फोनचा एकच विशेष म्हणजे तो लगेच लागतो व लागल्याचे लक्षात येते. धाडलेल्या पत्राचा प्रवास नजरेआड घडतो व ते पोचल्याचे विलंबाने कळते. या अडचणींचा परिहार करणारी जलद पत्रसेवा कुरियर सर्वांनाच निश्चिंत करण्याएवढी समर्थ होत चालली आहे.

1. 'ज्ञानदेव' हा शब्द खालीलपैकी काय आहे ? 01
अ. सर्वनाम ब. विशेषनाम क. नाम ड. भाववाचक नाम

2. लेखकाने अक्षरवाड्मयाच्या दालनात जाऊन बसलेल्या कोणत्या पत्रांचा उल्लेख परिच्छेदात केला आहे ? 03

3. पत्र आणि फोन या दोहोंतील तफावत लेखकांनी कशी वर्णन केली आहे ? 03

## SECTION-B
## (WRITING)

प्रश्न.3: खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. 10

1. माझं घर
2. छंद माझा वेगळा.
3. श्रमाचे महत्त्व
4. माझा आवडता समाजसुधारक

प्रश्न.3: खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. 10

1. माझा अविस्मरणीय प्रवास
2. ग्रंथ हेच गुरू
3. जाहिरातींच्या विळख्यात
4. मी पाहिलेला सूर्यास्त

प्रश्न.3: खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. 10

1. माझा आवडता ऋतू
2. विज्ञानाची जादू
3. माझी आजी
4. शाळेतील स्नेहसंमेलन

प्रश्न.3: खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. 10

1. चला खेडयाकडे
2. माझे घर–माझी माणसे
3. शाळेचा निरोप घेताना
4. गुरूचे महत्त्व

प्रश्न.3: खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. 10

1. रम्य ते बालपण
2. माझे आवडते शिक्षक
3. आईची ममता
4. मानव व पर्यावरण

प्रश्न.4: पुढील उता–याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा. 05

काय होतं या पृथ्वीवर ? वेडीवाकडी वाढलेली जंगलं, वळवळणारे किडे, सरपटणारे प्राणी, दलदल, निम्म्या कालावधीत अंधाराचं साम्राज्य. त्यात अन्न वस़्त्र, निवारा ही शोधायची अक्कल सलेला रानटी माणूस ....... सोबतीला हिंस्त्र पशू. पण आज मी आसपासच्या गोष्टी बघते तेव्हा पटतं की, अशा कित्येक गोष्टी आहेत की, ज्या केवळ माणसाच्या 'करण्यातूनच' निर्माण झाल्या आहेत. हे घर, ही खोली, त्यातली सजावट, हया वस्तू , फर्निचर, सायकल, मोटार, दिवा, पंखा , ही वही, हे पेन ....... अशी एकतरी वस्तू आहे का आसपास जी माणसाच्या श्रमातून निर्माण झालेली नाही ? आपोआप आली ? निसर्गात परमेश्वराने विपुल गोष्टी निर्माण केल्या आणि माणसाने घामाचे मोल देऊन त्यापासून सुखाचा , सौंदर्याचा प्रचंड खजिनाच निर्माण केला. पृथ्वीला सुंदर, अधिक आकर्षक केले. स्वर्ग केले. 'असेल हरी तर देईल खाटल्यावरी' असं जर माणसानं म्हटलं असतं तर आजही तुम्ही आम्ही वल्कलं नेसून, ओंगळ रूपात राहून, कंदमुळं खात, द–याखो–यांत, गुहांतून राहिलो असतो. श्रम हाच सुखाचा, प्रगतीचा मूलमंत्र आहे. दुस–या महायुद्धात बेचिराख झालेला जर्मनी, अणुस्फोटात घायाळ झालेला जपान पुन्हा उभे राहिले ते श्रमावरच !

प्रश्न.4: पुढील उता–याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा. 05

स्त्री ही अबला, हळवी, नाजूक म्हणून आजवर पुरूष तिला कधी सहानुभूतीने तर कधी उपकाराच्या भावनेने पाहत आलेला आहे. परंतु 21 व्या शतकातील स्त्रीने हे दाखवून दिले आहे की, मनात आणले तर ती देखील वाटेल ते कौशल्य प्राप्त करू शकते. म्हणूनच गेल्या पाच वर्षांत अनेक कर्तृत्ववान स्त्रियांची पिढीच तयार झाली. गुणवत्ता, तं्त्रज्ञान, व्यासंग, संशोधन, क्रीडा, सौंदर्यसुद्धा ! या सा–या क्षेत्रात त्यांनी म्हत्त्वपूर्ण आघाडी मिळवलीय. कराटेसारख्या खास पुरूषी वर्चस्वाच्या क्रीडा प्रकारात देखील स्त्रियांनी आपले पाय भक्कम रोवून प्रगतीचा पवित्रा घेतला आहे. झालं ! स्त्रियाचं संरक्षण आपल्या हातात असल्याचा पुरुषांचा जो तोरा होता तोही आता जिरला !

प्रश्न.4: पुढील उता–याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा. 05

भारतीय संस्कृतीचा 'संयम' हा एक प्रकारे आत्मा आहे, असे म्हटले तरी चालेल. भारतीय संस्कृती संयमावर उभारलेली आहे. आपण शंकराच्या देवळात जातो; परंतु आधी बाहेर कासवाची मूर्ती असते. या कासवाचे दर्शन घेतल्याशिवाय शिवाकडे, मृत्युंजयाकडे जाता येणार नाही आणि कासव म्हणजे काय ? कासव म्हणजे संयमाची मूर्ती.

कासव आपले सारे अवयव क्षणात आत घेते, क्षणात बाहेर काढते. स्वतःच्या विकासास अवसर असेल तर सारे अवयव बाहेर आहेत; स्वतःला धोका असेल, तर सारे अवयव आत आहेत. असे हे कासव भारतीय संस्कृतीने गुरूस्थानी मानिले आहे. देवाकडे जावयाचे असेल तर कासवाप्रमाणे होऊन जा. कासवाप्रमाणे स्वतःच्या इंद्रियांचे स्वामी व्हा. वाटेल तेव्हा इंद्रिये स्वाधीन राखता आली पाहिजेत. ज्याला जगाचे स्वामी व्हावयाचे असेल, त्याने आधी स्वतःचे स्वामी झाले पाहिजे. ज्याला देव आपलासा करून घ्यावयाचा आहे, त्याने स्वतःचे मन आधी आपल्या ताब्यात घ्यावयास पाहिजे.

प्रश्न.4: पुढील उता–याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा. 05

माणसाने माणसांत राहावे हे खरे;पण सतत माण्सांत राहणे बरे नाही. लोकांच्या सहवासाबरोबर त्याला एकांताची गरज असते. काही गोष्टी इतरांच्या संगतीत सुखाने करता येतात; पण काही वर्तनव्यापार इतरांमुळे कुंठित होतात. आपल्या जीवनप्रवाहाची ही वळणे मनोवेधक आहेत. क्रिकेट कधी एकटयाने खेळायचे नसते; पण उडी मात्र एकटयानेच मारायची असते. गायकाचे गाणे मैफलीत करताना इतरांचे अस्तित्व उपकारक ठरण्याऐवजी व्यत्ययासमान ठरते. आपण कधी एकटे असावे व कधी इतरांच्या सहवासात रमावे हे तारतम्याने कळते. स्फूर्तीसाठी एकांत आणि अभिव्यक्तीसाठी लोकांत हे जीवनसूत्र आहे. शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, कवी, विचारवंत, लेखक यांना अनेक वेळा एकांत नितांत आवश्यक असतो. जेव्हा मनाच्या सा–या शक्ती एकाच विषयावर केंद्रित करणे आवश्यक असते, तेव्हा एकांताशी नाते जोडावेच लागते.

प्रश्न.4: पुढील उता–याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा. 05

समाजात आपणाला माणसे दिसत, भेटत राहतात. कोणी आपले कौतुक करतात. कोणी आपल्याकडे पाहून नाके मुरडतात. तोंडावर गोड बोलणे व मागे निंदा करणे हा सुमार व्यक्तींचा मनोधर्म आहे. अशा व्यक्तींचा पाठपुरावा करू नये. केवळ त्यांच्या समाधानासाठी कशाची शहानिशा करीत बसू नये. असे करीत बसले तर आपल्या मनःशक्तीचा अपव्यय होतो. जग काय म्हणेल याचे गणित मांडत बसू नये. आपली विवेकबुध्दी काय म्हणते त्याकडे लक्ष द्यावे. इतरांनी केलेली आपली निंदा आपण विसरावी व स्वतः कोणाची निंदा करू नये, एवढेच एक तत्त्व पाळावे. याचा अर्थ असा नव्हे, की आपले प्रांजळ मतभेद आपण व्यक्त करू नयेत. अत्यंत विनयाने आणि तरीही योग्य तेवढया सुस्पष्टतेने आपली वेगळी मते बोलून दाखवावीत. कोणाला मुद्दाम चिडवू नये. कोणाची अनावश्यक, अप्रासंगिक व अप्रमाण स्तुतीपण करू नये. तोंडदेखलेपणा कटाक्षाने टाळावा. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे वागणे सरळ,निर्मळ,कोमल असावे. विरोधाचा वारा सहन करावा. निंदेच्या पावसात भलेपणाची छत्री उघडून धरावी.

# SECTION-C
# (GRAMMAR)

प्रश्न.5: पुढील वाक्यांचा काळ कंसातील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहाः (कोणतेही पाच) 05

1. मुलांच्या सतत गप्पा चालू असतात. (भूतकाळ करा)
2. हळूहळू अंधार पडू लागेल. (वर्तमान काळ)
3. तो रोज अभ्यास करतो. (भविष्यकाळ)
4. गेल्या वर्षी थंडी खूप होती. (वर्तमानकाळ)
5. राजा शिपायाला बोलावतो. (भूतकाळ)
6. आजही तेथे स्काऊटचे ऑफिस आहे. (भविष्यकाळ)

प्रश्न.5: पुढील वाक्यांचा काळ कंसातील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहाः (कोणतेही पाच) 05

1. काल तू कुठे गेला होतास ? (भविष्यकाळ)
2. आजी गोष्ट सांगत होती. (वर्तमानकाळ)
3. राम संध्याकाळी देवळात जातो. (भूतकाळ)
4. बाबा सोनलला रागावले. (वर्तमानकाळ)
5. रोहिणी फोनवर बोलते आहे. (भूतकाळ)
6. तो घरापासून खूप दूर गेला. (भविष्यकाळ)

प्रश्न.5: पुढील वाक्यांचा काळ कंसातील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहाः (कोणतेही पाच) 05

1. आजीचा काल उपास होता (वर्तमानकाळ)
2. प्रधान ऋषींना घेऊन येतो. (भूतकाळ)
3. आई स्वयंपाक करीत होती.(वर्तमानकाळ)
4. मीना काम करू लागली. (भविष्यकाळ)
5. राजश्री वर्गात नेहमी पहिली येते. (भूतकाळ)
6. राम श्यामबरोबर शाळेत जातो. (भविष्यकाळ)

प्रश्न.5: पुढील वाक्यांचा काळ कंसातील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहाः (कोणतेही पाच) 05

1. ''आज तू माझ्याकडे ये.'' (भविष्यकाळ)
2. राजूने पोपटाला पिंज–यातून सोडले होते. (वर्तमानकाळ)
3. आकाशात मेघांची गर्दी झाली होती. (भविष्यकाळ)
4. सरिता शांतपणे अभ्यास करीत होती. (वर्तमानकाळ)
5. राम सुंदर चित्र काढतो. (भूतकाळ)
6. परीक्षेसाठी तो शहरात जाणार आहे. (भूतकाळ)

प्रश्न.5: पुढील वाक्यांचा काळ कंसातील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहाः (कोणतेही पाच) 05

1. या वर्षी आम्ही काश्मीरला जाऊ (भूतकाळ करा)
2. सीमा आईला मदत करते. (भविष्यकाळ करा)
3. राणीने दासीला बोलावले. (वर्तमान काळ करा)
4. समीरने भाषण दिले. (भविष्यकाळ करा)
5. तू कोणत्या गावाला जातो आहे ? (भूतकाळ)
6. तो राजाजवळ तक्रार करेल. (वर्तमानकाळ करा)

प्रश्न.6: खालील वाक्यामधील अर्थावरील आधारित म्हणी कंसात दिलेल्या आहेत त्यापैकी योग्य म्हणीचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. 05

(बडा घर पोकळ वासा, निंदकाचे घर असावे शेजारी, तेल गेले तुप गेले हाती धुपारणे आले, नव्याचे नऊ दिवस, चोर सोडून संन्याशाला फाशी)

1. संपोषने एकाचवेळी दोन–दोन परीक्षा दिल्या परिणाम व्हायचा तोच झाला संतोष नापास झाला.
2. गावामध्ये दरोडा पडला पण पोलिसांनी दरोडेखोराचा शोध घेण्या ऐवजी एका वेडया माणसाला अटक केली.
3. गोडबोले काका आमच्या घरा जवळ राहतात पण नेहमी आमची निंदा करतात पण त्यांच्या या स्वभावामुळे आमचा मात्र फायदाच होतो.
4. बन्याबापू राहतात छानछोकीत पण वास्तवात मात्र दरिद्री नारायण आहेत.
5. नवी सायकल.नवी सायकल म्हणून सुबोध तिला किती जपायचा पण काही काळाने मात्र ती धूळ खात पडली आहे.

प्रश्न.6: खालील वाक्यामधील अर्थावरील आधारित म्हणी कंसात दिलेल्या आहेत त्यापैकी योग्य म्हणीचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. 05

(अडला हरी गाढवाचे पाय धरी, मरावे परी कीर्तिरूपे उरावे, करावे तसे भरावे, गर्वाचे घर खाली, रोज मरे त्या कोण रडे)

1. म.गांधीनी आयुष्यभर पवित्र कार्य केले म्हणूनच मृत्यू नंतरही आज त्यांचे नाव घेतले जात.
2. अवधूत रोजच आपल्या व्यथा मांडून प्रत्येकाकडे पैसे मागत असतो म्हणून त्याला कोणीही पैसे देत नाहीत.
3. शेजा–याचे झाड दुष्टभावनेने तोडण्याचा प्रयत्न फाल्गुनरावांनी केला पण ते झाड योगायोगाने त्यांच्याच घरावर पडले.
4. अशोकरावांना आपल्या नातवाच्या हुशारीचा फुकाचा अभिमान होता पण त्यांचा नातू शेवटी नापास झाला.
5. आपले काम पूर्ण करण्यासाठी अजबरावांना सरकारी कार्यालयात तेथील शिपायाचे पाय धरावे लागले.

प्रश्न.6: खालील वाक्यामधील अर्थावरील आधारित म्हणी कंसात दिलेल्या आहेत त्यापैकी योग्य म्हणीचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. 05

(उथळ पाण्याला खळखळाट फार, तहान लागल्यावर विहीर खणणे, इकडे आड आणि तिकडे विहीर, ज्याचे करावे भले तो म्हणतो आपलेच खरे, प्रयत्नांती परमेश्वर)

1. उद्या परीक्षा आहे आणि संजयने आज पुस्तक खरेदी केले आहे असे वेळेवर पुस्तक घेऊन त्याला फायदा होणार नाही.
2. नोकरी करावी तर मुलांकडे लक्ष देता येत नाही सोडावी तर घरखर्च चालत नाही वसुधाची द्विधा मनस्थिती झाली आहे.
3. मंगेश ज्ञानी–ज्ञानी म्हणून मिरवत असतो पण प्रत्यक्षात त्याल खूपच कमी ज्ञान आहे.
4. जगतला त्याच्या भल्यासाठी सर्वजन चांगला सल्ला देत होते. पण तो मात्र आपल्याच मनाने पण चूकीचे वागत होता.
5. अत्यंत कठिनातील कठिण काम पण सुरेशने ते प्रयत्नाने पूर्ण केलेच.

प्रश्न.6: खालील वाक्यामधील अर्थावरील आधारित म्हणी कंसात दिलेल्या आहेत त्यापैकी योग्य म्हणीचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. 05

(काखेत कळसा गावाला वळसा, कडू कारले तुपात तळले, साखरेत घोळले तरी कडू ते कडूच, थेंबे थेंबे तळे साचे, खाई त्याला खवखवे, गर्जेल तो पडेल काय )

1. स्पर्धेपूर्वी महेशने विजया संदर्भात खूप गप्पा मारल्या पण स्पर्धेत मात्र पराभव झाला. केवळ बडबड करणा–याकडून कृती होत नाही हेच खरे.
2. दुष्काळी कामावरील गैरव्यवहाराची खाते निहाय चौकशी करण्याचे आदेश आले आणि त्यामुळे गोविंदरावांच्या मनात मात्र धास्ती निर्माण झाली.
3. बाबांचा चश्मा त्यांच्या डोक्यावर त्यांनी लटकवला होता पण घरभर शोधत होते.
4. कितीही उपाय करून पाहिले पण माधवरावांची आरडाओरड करण्याची सवय जात नाही.
5. अक्षरशः एक–एक रूपाया जमवून त्यांनी आपले भव्य घर बांधले. खरेच थोडी–थोडी बचत जमा केली तर पूढे तीच मोठी होऊन उपयोगी येते.

प्रश्न.6: खालील वाक्यामधील अर्थावरील आधारित म्हणी कंसात दिलेल्या आहेत त्यापैकी योग्य म्हणीचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. 05

(बुडत्याचा पाय खोलात, आधी पोटोबा मग विठोबा, खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे, गाढवाला गुळाची वच काय ?, जेवीन तर तुपाशी नाही तर उपाशी)

1. विजयराव तोंडावर बोलतेवेळी बोलतात एक पण कृती करताना मात्र वेगळीच करतात.
2. अरे त्याला गणितामधील काहीच माहिती नाही आणि तू त्याला मोठे समीकरण समजावून सांगतो आहेस त्याचा उपयोग काय ?
3. मिळाले तर चांगलेच पाहिजे नाहीतर मुळीच नको अशी भूमिका नेहमी भगवंतरावाची असते. त्याला कोण काय करणार ?
4. विनोदवर एका मागे एक अशी वारंवार संकटे आली आणि त्यामुळे त्याचे मनोधैर्यही खचत आहे.
5. रघुनाथराव प्रथम आपला स्वार्थ पाहतात मगच समाजाचा विचार करतात.

प्रश्न.7: खालील वाक्ये शुध्द करून लिहा. (कोणतेही पाच) 05

1. त्याचे वडिल परदेषात असतात.
2. आर्जिने तूला बोलावले आहे.
3. राजा दार्बारात येताच सगळयांनी मूजरा केला.
4. तू त्याचे म्हणणे पहील्यांदा एक
5. कश्टाशिवाय भाकरी कशी मीळणार ?
6. कशाला हव्यात ऐवढया परिक्षा ?

प्रश्न.7: खालील वाक्ये शुध्द करून लिहा. (कोणतेही पाच) 05

1. त्याची राहणी खुपच साधि आहे.
2. राजसी रडतच घरि आलि.
3. चल, आपन भाजी आणु.
4. हा माझ्या जिवनातील आनंदाचा क्सण आहे.
5. भारतचाचा इतीहास खूप रजंक आहे.
6. आज तेला एक रूमाल सापडला.

प्रश्न.7: खालील वाक्ये शुध्द करून लिहा. (कोणतेही पाच) 05

1. आइचा केवढा वीश्वास आहे माझ्यावर !.
2. मूलांनो ! नियीमत अभ्यास करा.
3. राजाच्या भाशणाने सैन्यात विरश्री संचारली.
4. मी एवडे काम करून घेतो, मग आपण बोलू.
5. तानाजिने गझर केला
6. मिरा हसत–हसत वीष प्यायली.

प्रश्न.7: खालील वाक्ये शुध्द करून लिहा. (कोणतेही पाच) 05

1. संध्याकाळपासुन मला उधास वाटत होते.
2. समरगिते वाचून त्याला स्फूर्ति मिळते.
3. फालगून महिण्यात होळी हा सण येतो.
4. भुकंपामुळे ते शहर उध्वस्थ झाले.
5. लडाईत अनेक सैनीक बेहोष झाले.
6. श्रीक्रिष्ण जयंतीला अनेक मुलांनी स्पर्देमध्ये भाग घेतला.

प्रश्न.7: खालील वाक्ये शुध्द करून लिहा. (कोणतेही पाच) 05

1. अजिंठयातील लेणि अप्रतीम आहे.
2. बंडु नीराश झाला.
3. तो हुषार वीदयार्थी आहे.
4. रामाने सून्दर रांगोळि काढली.
5. मनाचि उदासिन्ता थोडी कमी झाली.
6. त्याचा चेहरा नेहमि षांत असतो.

प्रश्न.8: खालील वाक्ये सूचनेनुसार बदलून लिहा. 05

1. काव्यसंमेलनात नामांकित <u>कवी</u> आले. (अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)
2. तो एक <u>साहित्यिक</u> आहे. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)
3. झाडाच्या पानावर एक <u>किडा</u> दिसला. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)
4. <u>उंबरठा</u> ओलांडून मी घरात आले. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)
5. <u>आजी</u> आता खूपच म्हातारी झाली आहे. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)

प्रश्न.8: खालील वाक्ये सूचनेनुसार बदलून लिहा. 05

1. काकांकडे चार <u>गडी</u> कामाला आहेत. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)
2. तानाजीने गडावरून <u>दोर</u> खाली सोडला. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)
3. हातातली <u>घागर</u> रिकामी होती. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)
4. देवळाबाहेर एक <u>ओटा</u> आहे. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)
5. धावण्याच्या शर्यतीत <u>तो</u> पहिला आला. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)

प्रश्न.8: खालील वाक्ये सूचनेनुसार बदलून लिहा. 05

1. राजा उद्यानात फिरत होता. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)
2. मित्राने माझ्यासाठी पुस्तक आणले. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)
3. शेतकरी छतावर कौल बसवत होता. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)
4. हे घर टेकडीच्या पलीकडे आहे. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)
5. मुंबईत खूप जुन्या चाळी आहेत. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य लिहा)

प्रश्न.8: खालील वाक्ये सूचनेनुसार बदलून लिहा. 05

1. चिमणी घरटयातून उडाली. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)
2. मधूच्या घरासमोर मंदिर आहे. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य लिहा)
3. रघूने बाजारातून भाजी आणली. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)
4. आज बाबा लवकर घरी आले. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून लिहा)
5. महाराजांनी किल्ला जिंकला. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)

प्रश्न.8: खालील वाक्ये सूचनेनुसार बदलून लिहा. 05

1. वाघ जंगलात फिरत होता. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)
2. दरबारात सेवक हजर झाला. ( अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य लिहा)
3. नदीच्या पलीकडे सुंदर गाव आहे. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)
4. राजूने अचूक उत्तर दिले. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)
5. त्याने कायदा पाळला. . ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा)

# SECTION-D
## (Literature)

प्रश्न.9: खालीलपैकी कोणत्याही एका अवतरणाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. 10

1. उदारता आणि आदरातिथ्य यांच्याशी हरिहररावांचे सघन नाते होते.
2. या घराच्या खूप खूप कडूगोड आठवणी घराबाहेर निघून गेल्यासारख्या वाटत होत्या.

प्रश्न.9: खालीलपैकी कोणत्याही एका अवतरणाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. 10

1. रंध्रारंध्रातून व्यापून राहिलेले वर्षानुवर्षाचे कष्टच जणू तिनं बाहेर टाकले.
2. दुस–या दिवसापासून दुप्पट उत्साहाने तो शेळया चारायला जाऊ लागला.

प्रश्न.9: खालीलपैकी कोणत्याही एका अवतरणाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. 10

1. जगात पैसा फार वाईट चीज आहे, आपल्या गाण्याची किंमत पैशात करू नकोस. तसं केलंस, तर विदयेची किंमत कमी होईल.
2. हैदराबादी वातावरणाने त्यांचे कविमन अधिकच सौंदर्यवेधी झाले.

प्रश्न.9: खालीलपैकी कोणत्याही एका अवतरणाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. 10

1. घराच्या तोडलेल्या अर्धवट भिंती, देवघराच्या उरलेल्या फरशा, बाहेरचा माझा आवडता ओटा सगळं केविलवाणं दिसत होतं.
2. शेणातला किडा काय शेणात राहत नाही.

प्रश्न.9: खालीलपैकी कोणत्याही एका अवतरणाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. 10

1. तिची सारी ताकद, तिचं सार बळ भाकरीच्या लढाईत खर्च होत नसेल का ?
2. वरवर पाहता भाऊ हे सगळं मनापासून करत होता; आणि तरिही त्याचा जीव मात्र जुन्या घरातच अधिक गुंतलेला होता.

प्रश्न.10: खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

1. लेखकाने हरिहरराव सोनुले यांचे कोणकोणते गुणविशेष सांगितले आहेत ?
2. ज्योत्स्ना कदम यांच्या घरासभोवारच्या बागेचे वर्णन करा.
3. 'भास्करबुवा' होण्यासाठी भास्करला कोणते परिश्रम घ्यावे लागले ?

प्रश्न.10: खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

1. आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करत नव्हती ?
2. भास्करबुवा होण्यासाठी भास्करला कोणते परिश्रम घ्यावे लागले ?
3. हरिहररावांनी कोणते कार्य केले ?

प्रश्न.10: खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

1. आडाच्या दिशेने चालू लागल्यावर लेखकाच्या मनात कोणते विचार आले ?
2. ज्योत्स्ना कदम यांच्या घरात कोणत्या अडचणी होत्या ?
3. हरिहरराव सोनुले यांना कोणकोणत्या गोष्टींची आवड होती ?

प्रश्न.10: खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

1. हरिहररावांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय दया.
2. घर पाडण्यापूर्वी ज्योत्स्ना कदम यांच्या भावाने काय तयारी केली ?
3. खॉसाहेबांनी भास्करची परीक्षा कोणत्या पद्धतीने घेतली ?

प्रश्न.10: खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

1. घराकडे पाहून ज्योत्स्ना कदम यांना उदास का वाटू लागले ?
2. लोकप्रतिनिधी म्हणून हरिहररावांनी कोणते कार्य केले ?
3. गुरूची विदया प्राप्त करण्यासाठी भास्करबुवांनी कोणते कार्य केले ?

प्रश्न.11: खालीलपैकी कोणत्याही एका कडव्याचे आशय–सौंदर्य संदर्भासह स्पष्ट करा. 05

1. न्याय नीतीसाठी
शस्त्र व्हावे वाणी
साखर पेरणी
न ये कामा

किंवा

सर्व काही देता यावे, श्रेय राहू नये हाती ;
यावी लाविता कपाळी भक्तिभावनेने माती.

प्रश्न.11: खालीलपैकी कोणत्याही एका कडव्याचे आशय–सौंदर्य संदर्भासह स्पष्ट करा. 05

1. राहो बनून आकाश माझा शेवटचा श्वास ;
मनामनांत उरावा फक्त प्रेमाचा सुवास

किंवा

ज्योत ज्योतीने जागवा करा प्रकाश सोहळा
इवल्याशा पणतीने होई काळोख पांगळा

प्रश्न.11: खालीलपैकी कोणत्याही एका कडव्याचे आशय–सौंदर्य संदर्भासह स्पष्ट करा. 05

1. घाम गाळण्याचा असा
गडया तुझा माझा वसा
तो राबणारा पहा जथा
त्यात नसून कसं चालेल ?

किंवा

सर्व काही देता यावे,
श्रेय राहू नये हाती ;
यावी लाविता कपाळी
भक्तिभावनेने माती.

प्रश्न.11: खालीलपैकी कोणत्याही एका कडव्याचे आशय–सौंदर्य संदर्भासह स्पष्ट करा. 05

1. जरी पेरती अंधार , फुटू नये त्या अंकूर
हातातल्या ज्योतीसाठी नको कुणाची फुंकर

किंवा

ठेवोनिया माथा
'अखंड' अभंग
माझा मी नभंग
खरडतो.

प्रश्न.11: खालीलपैकी कोणत्याही एका कडव्याचे आशय–सौंदर्य संदर्भासह स्पष्ट करा. 05

1. पक्की ठेव खूण गाठ
तुझी असू दे मान ताठ
मेंढराच्या कळपात
असं घुसून कसं चालेल ?

किंवा

व्हावे एवढे लहान सारी मने कळो यावी
असा लाभावा जिव्हाळा पाषाणाची फुले व्हावी.

प्रश्न.12: खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

1. 'कसं चालेल ?' असा प्रश्न कवी कोणकोणत्या संदर्भात करतात ?
2. श्रमिकांनी काय करावे असे कवीला वाटते ? का ?
3. कवीच्या कोणकोणत्या उदात्त इच्छा या कवितेतून व्यक्त होताना दिसतात ?

प्रश्न.12: खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

1. 'अंधारपखाली' या कवितेत कवीने कोणते प्रश्न उपस्थित केले आहेत ?
2. आत्मसन्मानाने जगण्यासाठी कवीने कोणता मार्ग सांगितला आहे ? स्पष्ट करा.
3. आपल्या इच्छा पूर्ण होण्यासाठी कवी स्वतःमध्ये कोणते बदल घडवू इच्छितात ?

प्रश्न.12: खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

1. 'अंधारपखाली' या कवितेत कोणती अपेक्षा व्यक्त केलेली आहे ?
2. स्वतःच्या इच्छा पूर्ण होण्यासाठी कवी स्वतःत कोणता बदल करू इच्छितो ?
3. 'संघर्ष' कवितेत श्रमिकांनी स्वतःच्या न्यायासाठी काय करावे असे कवीला वाटते ?

प्रश्न.12: खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

1. 'संघर्ष' कवितेत श्रमिकांना कवीने कोणता संदेश दिला ?
2. 'अंधारपखाली' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.
3. कवी म.म.देशपांडे यांना कशाची 'तहान' लागलेली आहे ?

प्रश्न.12: खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

1. विषमता नष्ट होण्यासाठी कवी किशोर घोरपडे यांनी कोणती अपेक्षा व्यक्त केली ?
2. 'तहान' कवितेत कवी कोणकोणत्या उदात्त इच्छा व्यक्त करतात ?
3. 'अंधारपखाली' या कवितेत कवीने कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे ?

प्रश्न.13: अ. 'अंगठा' या कथेतून कोणता बोध मिळतो ? 06

ब. तुमच्या शालेय जीवनात शिक्षकांचे प्रोत्साहन मिळून तुम्ही यशस्वी झालात असा प्रसंग तुमच्या शब्दांत लिहा. 04

प्रश्न.13: अ. प्रीतमच्या जीवनातील बाईंचे महत्त्व स्पष्ट करा. 06

ब. गणपासारखी व्यक्ती तुम्हाला भेटली तर तुम्ही त्याला कशी मदत कराल ? 04

प्रश्न.13: अ. वेळच्या वेळी कर्जाचे हप्ते भरूनसुद्धा गणपा कर्जाच्या विळख्यात कसा अडकला ? 06

ब. प्रीतमने शिक्षिकेला आईचा दर्जा देऊन कृतज्ञता व्यक्त केली तशी कृतज्ञता तुम्ही दैनंदिन जीवनात कशी व्यक्त करता ? 04

प्रश्न.13: अ. प्रीतमच्या घरच्या परिस्थितीचे वर्णन माधुरी शानभाग यांनी कसे केले आहे ? 06

ब. गणपासारखे कर्ज काढून सण–समारंभ साजरे करणे ही प्रथा तुमच्या मते योग्य आहे का ? 04

प्रश्न.13: अ. 'या बाई म्हणजे माझ्या एकुलत्या कुटुंबीय आहेत' असे प्रीतम का म्हणाला ? 06

ब. निरक्षरतेमुळे गणपाची फसवणूक झाली तशी इतरांची होऊ नये, यासाठी तुम्हाला काय करावेसे वाटते ? 04

$$$$$$$$$$$$$$$$